महाराष्ट्राच्या ग्रामीण व शहरी भागातील लोकप्रिय दैनिक

# दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

मुंबई ● नवी मुंबई ● ठाणे ● पालघर ● रायगड

कार्यकारी संपादिका : डॉ. प्रतिक्षा रविंद्र घोडविंदे (एम.डी.)

शुक्रवार ■ २८ नोव्हेंबर २०२५ ■ वर्ष - सातवे ■ अंक : १५३ ■ RNI No. MAHMAR/2016/7209 ■ किंमत - ०२ रुपये

# बदलापूर नगरपालिकेची एक हाती सत्ता द्या, आणि विकास कामांची जबाबदारी माझ्यावर सोपवा!

## नगरपालिका निवडणुकीसाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची बदलापुरात प्रचार सभा

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**बदलापूर :** बदलापुरला येणाऱ्या मेट्रो १४चे काम मी मुख्यमंत्री असेपर्यंत केले. मात्र त्यानंतर स्थगिती सरकारने नंतर ते काम अडकवले. आता या मेट्रो मार्गाची निविदा निघाली आहे. पूर्वीप्रमाणे आता मेट्रो प्रकल्पासाठी अनेक वर्ष लागणार नाही. मेट्रो प्रकल्प तीन ते चार वर्षात पूर्ण करण्यासाठी नियोजन केले आहे, असे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले.

तर मेट्रो पाच ही बदलापुरपर्यंत कशी येईल यासाठीही प्रयत्न करणार असल्याचे आश्वासन यावेळी फडणवीसांनी दिले. बदलापुरात नगरपालिका निवडणुकांच्या प्रचारासाठी फडणवीस गुरूवारी बदलापुरात आले होते. शिंदेंच्या शिवसेनेविरूद्ध येथे भाजप आणि अजित पवारांची राष्ट्रवादी काँग्रेस युती निवडणूक लढते आहे. फडणवीसांनी येथे शिवसेनेवर टीका करण्याचे टाळले. त्यामुळे मुख्यमंत्री फडणवीस नेमके काय बोलतात याकडे लक्ष लागले होते. मात्र फडणवीसांनी शिंदेंच्या शिवसेनेवर टीका करणे टाळले. भाषणाच्या सुरूवातीलाच त्यांनी, मी कुणावर टीका टिपणी करण्यासाठी, उणीधुणी काढण्यासाठी आलो नाही, असे स्पष्ट केले. शहर विकासाची ब्लु प्रिंट घेऊन आलो आहे. ज्यांच्याकडे बोलायला नसते, ज्यांना विकास काय माहिती नाही ते उणीधुणी काढतात, असेही फडणवीस यावेळी म्हणाले. आमच्याकडे विकासाचा अजेंडा आहे. त्यामुळे शहर विकासासाठी बदलापुरात भाजपच्या रूचिता घोरपडे यांना विजयी करा असे आवाहन यावेळी फडणवीस यांनी केले.



सर्वच मेट्रोचे काम आता तीन ते चार वर्षात पूर्ण करण्यासाठी नियोजन केले आहे, असेही यावेळी फडणवीस म्हणाले. सर्वसामान्यांची लोकल रेल्वे सुरक्षित करायची आहे. मेट्रोसारखे रेल्वेचे डब्बे होणार तेही कोणतीही भाडेवाढ न करता, असेही यावेळी फडणवीसांनी जाहीर केले. एमएमआरडीएच्या माध्यमातून रस्ते विस्तार, सिमेंट काँक्रीट रस्ते, पाणीपुरवठा, भुयारी गटार यांसह अनेक विकासकामांसाठी मी निधी मंजूर करून दिला आहे. आज प्रचार सभेत मी टीकाटिप्पणी करण्यासाठी किंवा शिव्यांची उधळण करण्यासाठी आलो नाही, तर झालेली आणि होणारी विकासकामे मांडण्यासाठी आलो आहे. ज्यांच्याकडे दाखवायला कोणतीही विकासकामे नाहीत तेच फक्त आरोप-प्रत्यारोपाने शिव्या-शाप देणार. त्यामुळे त्यांना तसे करू द्या, या शब्दांत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विरोधकांवर अप्रत्यक्ष टीका केली.

या वेळी वनमंत्री गणेश नाईक, आमदार किसन कथोरे, परशुराम आर्थिक विकास महामंडळाचे अध्यक्ष कॅप्टन आशीष दामले, आमदार कुमार आयलानी, आमदार सुलभा गायकवाड, निरंजन डावखरे, सुभाष गोटीराम पवार, माजी केंद्रीय मंत्री कपिल पाटील, अंबरनाथ नगरपालिका निवडणुकीच्या नगराध्यक्ष पदाच्या उमेदवार तेजश्री करंजुले पाटील आणि बदलापूर नगरपालिका निवडणुकीच्या नगराध्यक्ष पदाच्या उमेदवार रुचिता घोरपडे, भाजपा, राष्ट्रवादी व आरपीआय गटाचे कार्यकर्ते व पदाधिकारी उपस्थित होते. २०१४ नंतर बदलापूरच्या विकासाला गती मिळाली असून, विविध सुविधांसाठी निधी मिळाल्याने शहराचा चेहरामोहरा बदलला आहे. शहरासाठी मेट्रो १४चे काम पुन्हा गतिमान केले असून, १८ हजार कोटींच्या टेंडरनंतर ते पुढील पाच वर्षांत पूर्ण होणार असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले. चिखलोली ते बदलापूर मेट्रो विस्तारासाठीही प्रयत्न सुरू असल्याचे त्यांनी जाहीर केले.



> राज्याचे सर्वांचे लाडके मुख्यमंत्री आदरणीय देवेंद्र फडणवीस यांनी बदलापूर शहराला गावापासून शहरामध्ये आणि शहरापासून आता महानगर मध्ये नेऊन ठेवले आहे. मी ज्यावेळेला सुरुवातीला आमदार झालो तेव्हा या शहराची लोकसंख्या 54 हजार होती आता पाच लाखापेक्षा अधिक आहे. बदलापूरवासियांना किंवा माझ्या मतदारसंघाला मुख्यमंत्र्यांनी कधीच नकार दिला नाही, निश्चितपणे चांगले चांगले प्रकल्प या शहरासाठी आपण दिशा दिली आणि आताही मार्ग लावण्याचा सगळे प्रयत्न आहेत आणि त्याला चांगलं यश आमच्या बदलापूर शहराच्या विकासाच्या दृष्टीने होते आहे.
>
> ■ आ. किसन कथोरे

## लक्षवेधी

### नवी मुंबईत मतदार यादीत ४५, ५८८ दुबार नावे?

**मनसे, उबाठा पक्षाचे आक्षेप**

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**नवी मुंबई :** नवी मुंबई महापालिका निवडणुकीसाठी २० नोव्हेंबरला प्रारूप मतदार याद्या जाहीर करण्यात आल्या असून या मतदार याद्यांवर आतापर्यंत ३५० पेक्षा अधिक हरकती घेण्यात आल्या आहेत. गुरुवारी २७ नोव्हेंबरपर्यंत हरकती घेण्याची मुदत देण्यात आली होती. परंतु ती ३ डिसेंबरपर्यंत वाढविण्यात आली आहे. तर दुसरीकडे मनसेने व उबाठाने यादीवर विविध आक्षेप घेतले आहेत. प्रारूप यादीत ४५ हजार ५८८ दुबार मतदार असल्याचा आक्षेप मनसेने घेतला आहे. नवी मुंबई महापालिका क्षेत्रात मतदार याद्यांवरुन मोठा गोंधळ निर्माण झाला असून आयुक्त निवास, सार्वजनिक शौचालय अशा विविध ठिकाणी मतदारांची नावे नोंद झाल्याचे मनसेने दाखवून दिले होते. मनसेने बुधवारी पुन्हा पालिकेकडे ४५ हजार ५८८ दुबार नावे असल्याचा आक्षेप नोंदवला. ही नावे वगळण्याची मागणी मनसेचे नवी मुंबई शहराध्यक्ष गजानन काळे यांनी पालिकेकडे केली. तर शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षानेही दुबार नावे, छायाचित्र नसणे, फक्त वायटीआर नंबर व फोटो असून नावच नसणे अशा तक्रारी नोंदवल्या आहेत. दरम्यान, दुबार नावांबाबत बीएलओंच्या मार्फत नियमानुसार योग्य ती कार्यवाही केली जाणार आहे, असे महापालिकेच्या निवडणूक विभागाचे उपायुक्त भागवत डोईफोडे यांनी सांगितले.

### भिवंडी : अपघातात सहा वर्षीय चिमुरडीचा मृत्यू

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**भिवंडी :** भिवंडी शहरातील वंजारपट्टी नाका परिसरातील डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम उड्डाणपुलावर बुधवारी दुपारी झालेल्या भीषण अपघातात सहा वर्षीय चिमुरडीचा मृत्यू झाला असून तिचे वडील गंभीर जखमी झाले आहेत. खादिजा शेख (६) असे मृत मुलीचे नाव असून डॉ. उमर शेख हे गंभीर जखमी आहेत. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, वाड्याकडून नाशिककडे जाणारा ट्रक नदीनाका मार्गे शहरात प्रवेश करत असताना, त्याचवेळी फरीद बाग परिसरातील रहिवासी डॉ. उमर शेख आपल्या मुलीला निजामपूर येथील 'माझरीन इंग्लिश स्कूल' मधून घेऊन दुचाकीवरून घरी जात होते. उड्डाणपुलावर ट्रकने दिलेल्या जोरदार धडकेत खादिजा दुचाकीवरून पडून थेट ट्रकच्या चाकाखाली आली. गंभीर जखमी झालेल्या चिमुरडीचा घटनास्थळी मृत्यू झाला. तर विरुद्ध दिशेने फेकले गेल्यामुळे डॉ. उमर शेख गंभीर जखमी झाले. अपघातानंतर नागरिकांच्या मदतीने चालक सिराज कसुवर कुरेशी याला ताब्यात घेण्यात आले. घटनेची माहिती मिळताच निजामपूर पोलीस घटनास्थळी दाखल झाले. खादिजाचा मृतदेह स्व. इंदिरा गांधी रुग्णालयात उत्तरीय तपासणीसाठी पाठविण्यात आला आहे.




### विद्यार्थ्यांनी काढली संविधान प्रचार रॅली !

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**शहापूर ग्रामीण --( नरेंद्र पाटील)**

वासिंद जवळील जिल्हा परिषद शाळा, कांदळी या शाळेत संविधान गौरव दिन साजरा करुन संविधानाचा प्रचार- प्रसार करण्यासाठी संविधान प्रचार रॅली काढण्यात आली. सदर कार्यक्रमात संविधानाचे शिल्पकार महामानव संविधान निर्माते डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेला शाळा समिती अध्यक्षा प्रगती दळवी यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण व दीप प्रज्वलन करून अभिवादन करण्यात आले. तसेच संविधान प्रतिला उपस्थित मान्यवर, पालक, शिक्षक व विद्यार्थी यांनी पुष्प अर्पण करून अभिवादन केले व संविधान उद्देशिकेचे सामूहिक वाचन करण्यात आले.

शाळेचे सहशिक्षक अशोक गायकवाड यांनी भारतीय संविधान दिन या विषयावर प्रबोधनपर मार्गदर्शन केले तसेच विद्यार्थ्यांनी संविधान विषयी भाषणे व निबंध लेखन केले. यानंतर विद्यार्थ्यांना खाऊ, लेखन साहित्य वाटप करण्यात आले. या कार्यक्रमासाठी ग्रामपंचायत अधिकारी किशोर गोडसे, सदस्य अनंता जाधव, धनश्री बेलवले, प्रकाश जाधव, शाळा समिती अध्यक्षा प्रगती दळवी, सदस्या आरती पाटील, साक्षी जाधव, अंगणवाडी सेविका कविता जाधव, गोदावरी जाधव, शाळेच्या मुख्याध्यापिका जयश्री पष्टे, सहशिक्षक अशोक गायकवाड आदी पालक वर्ग, ग्रामस्थ उपस्थित होते

## बदलापूर- कर्जत दरम्यान तिसऱ्या - चौथ्या मार्गिकेला मंजूरी

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे :** मध्य रेल्वेवरील प्रवाशांसाठी एक मोठा दिलासा देणारा प्रकल्पाला रेल्वे मंत्रालयाने मंजूरी दिली आहे. बदलापूर ते कर्जत रेल्वे स्थानका दरम्यान तिसऱ्या आणि चौथ्या मार्गिकच्या निर्माणासाठी मंजूरी मिळाली असून त्यामुळे मध्य रेल्वेतील प्रवाशांना मोठा दिलासा मिळण्याची चिन्हे आहेत. तसेच प्रवासालाही गती मिळणार आहे. मध्य रेल्वे मार्गावरील खोपोली, कर्जत, भिवपूरी रोड, नेरळ, शेलू, वांगणी या भागातून लाखो नोकरदार बदलापूर, उल्हासनगर, ठाणे, मुंबई उपनगरात नोकरी निमित्ताने येतात. बदलापूर, कर्जत भागात नागरिकरण वाढले असल्याने किरकोळ व्यापारी, शिक्षक, महाविद्यालयीन विद्यार्थी हे देखील रेल्वे मार्गाने प्रवास करतात.

पावसाळ्यात कर्जत भागातील विविध पर्यटनस्थळांवर देखील नागरिक जातात. परंतु या मार्गावरील उपनगरीय रेल्वेगाड्यांमध्ये प्रवाशांची मोठी गर्दी असते. लांब पल्ल्याच्या रेल्वेगाड्या देखील या भागातून वाहतुक करत असतात. त्यामुळे उपनगरीय रेल्वेगाड्यांचे वेळापत्रक बिघडून त्याचा परिणाम येथील स्थानिक रहिवाशांना, पर्यटकांना सहन करावा लागतो. रेल्वे गाड्यांमध्ये प्रचंड गर्दी असते. रेल्वेगाडीत एखादा तांत्रिक बिघाड झाल्यास येथील वाहतुक जवळपास ठप्प होत असते. हा प्रकल्प पूर्ण झाल्यास एक्स्प्रेस रेल्वेगाड्यांमुळे उपनगरीय रेल्वेगाड्यांचा होणारा खोळंबाही दूर होण्याची शक्यता आहे.

**काही वर्षांपूर्वी रेल्वेने कल्याण ते बदलापूर अशा १४ किलोमीटरच्या प्रकल्पास मंजूरी दिली होती. त्यानंतर आता बदलापूर ते कर्जत या तिसऱ्या आणि चौथ्या मंजूरी दिल्याने कल्याण ते कर्जत हा प्रवास सुखकर होणार आहे. पंतप्रधानांच्या अध्यक्षतेखालील आर्थिक व्यवहार विषयक मंत्रिमंडळ समितीने बुधवारी रेल्वे मंत्रालयाच्या दोन प्रकल्पांना मंजुरी दिली आहे. ज्यांचा एकूण खर्च अंदाजित २,७८१ कोटी रुपये इतका आहे. या प्रकल्पांत बदलापूर- कर्जत तिसरी आणि चौथी मार्गिका ३२ किमीचा आहे. बदलापूर - कर्जत मार्गिका प्रकल्प हा मुंबई उपनगरीय कॉरिडॉरचा एक भाग आहे. तिसरा आणि चौथा मार्ग प्रकल्प मुंबई उपनगरीय क्षेत्रातील दळण-वळण सुधारेल असे रेल्वेचे म्हणणे आहे.**

## ठाणे जिल्हा परिषदेच्या ई-ऑफीस प्रणालीत 17 हजार नस्तींचा निपटारा

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे :** ठाणे जिल्हा परिषदेतील सर्व विभागांमध्ये कागद विरहित कामकाजाला गती मिळाली असून आतापर्यंत ई-ऑफीस प्रणालीत १७ हजार नस्तींचा निपटारा करण्यात आला आहे, अशी माहिती जिल्हा परिषदेच्या मार्फत देण्यात आली. प्रशासकीय कामकाज सुरळीत आणि वेगवान व्हावे यासाठी ठाणे जिल्हा परिषदेने ई- ऑफीस सुविधा सुरु करण्याचा निर्णय २०२३ मध्ये घेतला होता. त्यानुसार, प्रत्यक्ष अंमलबजावणी करण्यावर देखील जिल्हा परिषदेने भर दिला होता. परंतु, ई-ऑफीस प्रणालीत कागदपत्रे अपलोड करताना येत असलेल्या तांत्रिक अडचणीमुळे



कर्मचाऱ्यांना प्रत्यक्ष नस्ती घेऊन ते पूर्ण करावे लागत होते. त्यात, कर्मचाऱ्यांमध्ये असलेला तांत्रिक ज्ञानाचा अभाव यामुळे देखील एक नस्ती अपलोड करण्यास अधिकचा वेळ लागत होता. परंतू, जिल्हा परिषदेचा कारभाराला गती मिळावी आणि हे काम सुरळित व्हावे याकरिता सर्व विभागांच्या अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना ई ऑफीस प्रणालीचे प्रशिक्षण देण्यात आले.

> **ठाणे जिल्हा परिषद आता पेपरलेस झाली आहे. सर्व फाईल्स ऑनलाइन झाल्याने एका क्लिकवर उपलब्ध होणार आहे. त्यामुळे ग्रामस्थांचे प्रश्न जलद सुटणार असून त्यांना दिलासा मिळणार आहे.**

त्यासह, संबंधित विभागाला तांत्रिक अडचणी सोडविण्यास सांगण्यात आले. त्यानुसार, १५० दिवस कृती कार्यक्रमांतर्गत सर्व विभागांमध्ये कागदविरहित कामकाजाला मोठ्या प्रमाणात गती मिळाली आहे. प्रशासनातील सर्व नस्ती ई-ऑफिस प्रणालीद्वारे तयार केल्या जात असून यामुळे कामकाजात पारदर्शकता, गती, तसेच ग्रामस्थांच्या विविध प्रश्नांचे जलद निराकरण होत आहे.







## ठाणे महापालिका निवडणूक आरक्षण 36 % आत!

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे :** स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकामध्ये काही ठिकाणी आरक्षणाची ५० टक्के मर्यादा ओलांडल्याप्रकरणी सर्वोच्च न्यायलयात शुक्रवारी सुनावणी होणार आहे. या न्यायालयीन निकालावर निवडणुकांचे भवितव्य अवलंबून असले तरी ठाणे महापालिकेच्या निवडणुकीसाठी झालेल्या आरक्षण प्रक्रियेत आरक्षणाची टक्केवारी ३६ टक्क्यांच्या आत असल्याचे समोर आले आहे.

नगरपालिका आणि नगर परिषदांच्या निवडणुकांचा कार्यक्रम जाहीर झाला असून याठिकाणी निवडणुक प्रचाराला सुरूवात देखील झाली आहे. या निवडणुकांनंतर जिल्हा परिषद आणि महापालिकांच्या निवडणुका जाहीर होण्याची शक्यता वर्तविली जात होती. त्यानुसार जिल्हा परिषद आणि महापालिका निवडणुक विभागाने प्रभाग रचना अंतिम करत आरक्षण सोडत प्रक्रीयाही उरकली आहे. मात्र, या आरक्षण सोडत प्रक्रीयेत काही ठिकाणी आरक्षणाची ५० टक्के मर्यादा ओलांडण्यात आल्याचा दावे केले जात असून हे प्रकरण सर्वोच्च न्यायालयात दाखल झाले आहे. त्यावर सर्वोच्च न्यायलयात उद्या सुनावणी होणार आहे.

ठाणे महापालिकेची निवडणुक २०११ च्या जनगणनेनुसार होणार असून यानुसार, शहराची एकूण लोकसंख्या १८,४१,४८८ इतकी आहे. राज्य निवडणूक आयोगाने निश्चित केल्याप्रमाणे, महापालिकेच्या एकूण १३१ पैकी, अनुसूचित जातींसाठी ९ जागा, अनुसूचित जमातींसाठी ३ जागा, नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्गासाठी ३५ जागा आणि सर्वसाधारण प्रवर्गासाठी ८४ जागा आरक्षित केलेल्या आहेत. एकूण १३१ जागांपैकी महिलांसाठी ६६ जागा आरक्षित आहेत.



# कांदळवन किनारपट्टीचे सुरक्षा कवच

## जिल्हाधिकारी डॉ. इंदुराणी जाखड यांचे प्रतिपादन

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**पालघर** : कांदळवन हे आपल्या किनारपट्टीचे मजबूत सुरक्षा कवच असून जैवविविधता संरक्षण, समुद्री धूपनियंत्रण आणि नैसर्गिक आपत्तींचा धोका कमी करण्यासाठी त्यांचे अस्तित्व अत्यंत महत्त्वाचे आहे, असे प्रतिपादन जिल्हाधिकारी डॉ. इंदुराणी जाखड यांनी केले.



जिल्हाधिकारी तथा जिल्हास्तरीय कांदळवन संरक्षण व संवर्धन समितीच्या अध्यक्षा डॉ. इंदुराणी जाखड यांच्या अध्यक्षतेखाली समितीची महत्त्वपूर्ण बैठक जिल्हाधिकारी कार्यालयात पार पडली, त्या वेळी त्या बोलत होत्या. या बैठकीत कांदळवन संरक्षणाचे उपक्रम अधिक प्रभावी करण्यासाठी महसूल, वन, भूअभिलेख, स्थानिक स्वराज्य संस्थांसह विविध विभागांचे अधिकारी उपस्थित होते.

# सोनुभाऊ बसवंत महाविद्यालयात संविधान गौरव दिवस साजरा



दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**शहापूर ग्रामीण(नरेंद्र पाटील)-** सोनुभाऊ बसवंत महाविद्यालयात संविधान गौरव दिवस साजरा करण्यात आला.

आयक्युएसी,राष्ट्रीय सेवा योजना, राष्ट्रीय छात्र सेना, सांस्कृतिक विभाग, महिला विकास कक्ष व क्रीडा विभागाच्या संयुक्त विद्यमाने हा संविधान गौरव दिवस साजरा करण्यात आला. यामध्ये"घर घर संविधान " या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते तर यावेळी ग.वि. खाडे महाविद्यालयाचे प्राध्यापक दिगंबर खरात यांनी भारतीय संविधान या विषयावर व्याख्यान दिले.

याप्रसंगी महाविद्यालयाचे उप प्राचार्य डॉ. संतोष गायकवाड, आयक्युएसी समन्वयक डॉ.शहाजी वाघमोडे यासह आदी मान्यवर उपस्थित होते तर यामध्ये 78 स्वयंसेवकांनी सहभाग घेतला होता. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. डॉ. दशरथ कांबळे यांनी, उद्देशीकेचे वाचन प्रा.डॉ.राजू शनवार यांनी केले व आभार प्रा.डॉ.संतोष बुधवंत यांनी मानले.

# जीवनदीप महाविद्यालयात गोवेली येथे संविधान गौरव दिन साजरा



दै. ठाणे जीवनदीप वार्ता

२६ नोव्हेंबर भारतीय संविधान गौरव दिवस या दिवसाचे औचित्य साधून जीवनदीप महाविद्यालयात संविधान गौरव दिन राज्यशास्त्र विभाग,IQAC, राष्ट्रीय सेवा योजना, NCC यांच्या संयुक्त विद्यमाने साजरा करण्यात आला . याप्रसंगी अँड.नरेंद्र रामचंद्र पडते, उच्च न्यायालय मुंबई, अँड विलास सुरोशी संस्थेचे अध्यक्ष. रविंद्र घोडविंदे , प्राचार्य. डॉ.अशोक वाघ, उपप्राचार्य. हरेंद्र सोष्टे, यांनी संविधान प्रतिमेचे पूजन केले. त्यानंतर सामुदायिक संविधान वाचन व मूलभूत हक्क आणि कर्तव्याचे वाचन करण्यात आले. अँड.पडते यांनी भारतीय संविधानाची निर्मिती, त्याचा विकास, नागरिकांचे कर्तव्य मूलभूत हक्क याबद्दल विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. त्यांचे मार्गदर्शन विद्यार्थ्यांना नक्कीच दिशादर्शक ठरेल. या गौरव दिनामुळे विद्यार्थ्यांमध्ये संविधानाबद्दल आदरभाव आणि संवेदनशीलता अधिक दृढ झाली. त्यानंतर विद्यार्थ्यांना संविधान गौरव दिनावर जागरूकता म्हणून प्रश्नमंजुषा स्पर्धा घेण्यात आली. तसेच २६/११ चा दहशतवादी हल्ला व या हल्ल्यात शहीद झालेल्या जवानांना श्रद्धांजली वाहण्यात आली. या प्रसंगी IQAC,प्रमुख प्रा.प्रियंका पाटील, राष्ट्रीय सेवा योजना प्रमुख .प्रा. दिनेश धनगर, NCC प्रमुख प्रा. प्रवीण भालेराव , प्रा .धनश्री नाईक व महाविद्यालयातील प्राध्यापक, कर्मचारी वर्ग उपस्थित होते.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभारप्रदर्शन राज्यशास्त्र विभाग प्रमुख प्रा. जया देशमुख यांनी केले. विद्यार्थी प्राध्यापक शिक्षकेतर कर्मचारी यांच्या एकत्रित सहभागाने सदर कार्यक्रम यशस्वीरित्या संपन्न झाला.

भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिका

दी.अं.यो- राष्ट्रीय नागरी उपजिविका अभियान

जाहीर आवाहन

भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका हद्दीत पथविक्रेता / फेरीवाले यांचे बायोमेट्रिक सर्वेक्षण करण्याचे काम सुरू करण्यात आले आहे. याचा लाभ शहरातील सर्व फेरीवाले यांनी घ्यावा व आपण करीत असलेल्या व्यवसायाचे सर्वेक्षण करून घ्यावे. सर्वेक्षण झाल्यानंतर प्रत्येक फेरीवाला यांना ओळखपत्र व धंद्याचे प्रमाणपत्र देण्यात येणार आहे, जेणेकरून फेरीवाल्यांना त्यांची ओळख निर्माण होईल व व्यवसाय करण्यासाठीचा परवाना मिळेल. त्यानंतरच सदर फेरीवाला हा नोंदणीकृत फेरीवाला म्हणून ग्राह्य धरला जाईल व महानगरपालिकेने निश्चित केलेल्या फेरीवाल्याला क्षेत्रात व्यवसाय करता येईल. ज्या फेरीवाल्यांचे सर्वेक्षण होणार नाही ; तो फेरीवाला 'अनधिकृत' म्हणून समजला जाईल.

फेरीवाल्यांचे बायोमेट्रिक सर्वेक्षण करण्यासाठी सर्वेअर त्यांच्या व्यवसायाच्या ठिकाणी पोहोचतील त्यावेळेस त्यांना खालील कागदपत्र उपलब्ध करून देण्याची जबाबदारी ही संबंधित फेरीवाल्याची राहील.

१) आधार कार्ड
२) राशन कार्ड
३) महाराष्ट्र राज्य आधिवास प्रमाणपत्र (असल्यास)
४) दिव्यांग दाखला (असल्यास)
५) जात प्रमाणपत्र (असल्यास)
६) घटस्फोट / विधवा कागदपत्र (असल्यास)

सदर सर्वेक्षण हे ३१ डिसेंबर २०२५ पर्यंत सुरू राहणार असून सर्व फेरीवाल्यांनी आपले बायोमेट्रिक सर्वेक्षण वेळेत करून घ्यावे. ज्या फेरीवाल्यांचे सर्वेक्षण झालेले आहेत त्यांना तात्पुरते प्रमाणपत्र देण्यात येणार आहे.

सही /-
(विक्रम दराडे)
उपआयुक्त, दी.अं.यो.- रानाउअ
भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिका

जा.क्र./ज.सं.वि./१४५२
दि. २७/११/२०२५

## शहाड फाटक येथे जेसीबीला आग

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**उल्हासनगर:** कॅम्प क्रमांक १ शहाड उड्डाणपुलाशेजारी एका कंपनीचे जेसीबी मशीनद्वारे काम सुरू होते. बुधवारी दुपारी ३ वाजता मशीनमध्ये ऑइल गळती होऊन मशीनला आग लागली. या आगीने शहरातून जाणाऱ्या मुरबाड रस्त्यातील वाहतुकीवर परिणाम होऊन काही काळ वाहतूक ठप्प झाली होती. अग्निशमन दलाच्या बंबांनी काही तासात आग आटोक्यात आणली.

# महापे येथील गोदामावर मोठी कारवाई ▌ अवैध धान्य व्यापाऱ्यांमध्ये खळबळ

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे : त्या शिधावाटपाचे सरकारी धान्य खरेदी-विक्री केल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. ठाणे जिल्हा नियंत्रक कार्यालय व नागरी पुरवठा विभाग, मुंबई यांच्या संयुक्त कारवाईत तब्बल ▫4,69,923/- किमतीचा सरकारी तांदूळ जप्त करण्यात आला.ही कारवाई अवघ्या काही तासांच्या पाठपुराव्यानंतर अत्यंत गोपनीय पद्धतीने पार पडली—जेणेकरून दोषींना पळ काढता येऊ नये.**

**काय प्रकार घडला?**

मिळालेल्या माहितीच्या आधारे, महापे MIDC परिसरातील एका गोदामात शिधावाटपाच्या तांदळाची बेकायदा विक्री सुरू असल्याची शक्यता वर्तवण्यात आली होती.

नियंत्रण अधिकारी नागरी पुरवठा, मुंबई यांनी तातडीने पथक तयार करून 20 नोव्हेंबर रोजी सकाळी 11 वाजता धाड टाकली. तेथे सरकारी तांदळाचे मोठ्या प्रमाणावर पोते, अवैध खरेदी-विक्रीचे पुरावे, अनधिकृत वाहतुकीसाठी वापरला जाणारा टाटा एस वाहन (एमएच 43 एच 1765) असे सर्व आढळले. पथकाने वाहनचालक पिनू प्रसाद केरिया याला चौकशीअंती ताब्यात घेतले. केवळ 50% साठा गोदामातून काढला गेला असून उर्वरित 50% साठा ठाणे MIDC पोलीस स्टेशनमधून मिळाल्याच्या नोंदीही आढळल्या.

**सरकारी धान्याचे लुटमार जाळे उघडकीस**

चौकशीअंती समजले की, आरोपी स्वस्त धान्य दुकानांमधून मोठ्या प्रमाणावर धान्य गोळा करत, ते महापे व गोणपाडे येथील गोदामांमध्ये साठवत आणि त्याची खुले बाजारात बेकायदा विक्री करत होते.

अधिकाऱ्यांनी स्पष्ट केले की, जीवनावश्यक वस्तू अधिनियम 1955 अंतर्गत अशा प्रकारची बेकायदेशीर विक्री गंभीर गुन्हा आहे.

**आरोपींवर दाखल गुन्हा**

ठाणे MIDC पोलीस ठाणे येथे वाहनचालक पिनू प्रसाद केरिया, गोदाममालक शिवलाल गहलोत, त्याचा सहकारी राजन सिंह या आरोपींविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सर्वांवर बेकायदेशीर धान्य खरेदी-विक्री तस्करीचे गुन्हे (गुन्हा क्रमांक : 0444/2025 दिनांक : 21.11.2025) दाखल करण्यात आले आहेत.

**अवैध धान्यविक्री करणाऱ्यांवर वज्र मुठ" — नागरी पुरवठा विभागाचा इशारा**

नियंत्रक नागरी पुरवठा, मुंबई चंद्रकांत डांगे (भा.प्र.से.) यांनी सांगितले की, "सरकारी शिधावाटपाचे धान्य काळ्या बाजारात विकणाऱ्या कोणालाही पाठीशी घातले जाणार नाही. गरीब जनतेच्या अन्नावर डल्ला टाकणाऱ्यांविरुद्ध कडकात कडक कारवाई केली जाईल. अशा कारवाया नियमितपणे सुरू राहतील, असेही त्यांनी स्पष्ट केले.

**कृतीचा संदेश स्पष्ट—**
**अशा बेकायदेशीर धंद्यांना आता 'मार्ग बंद'**

ही कारवाई केवळ एक छापा नाही तर भविष्यात अशा तस्करी करणाऱ्यांना थेट इशारा आहे की सरकारी धान्यावर डल्ला टाकल्यास नागरी पुरवठा विभाग आणि पोलीस विभाग कठोर कारवाई करणार.

**महाराष्ट्र शासन सांस्कृतिक कार्य विभाग आयोजित ६४ वी राज्य हौशी मराठी नाट्य स्पर्धा कल्याण डोंबिवली महानगरपालिकेच्या आचार्य अत्रे रंगमंदिर या केंद्रावर सुरू असून या स्पर्धेत वेगवेगळ्या विषयांवर नाट्यप्रयोग सादर होत आहेत. दि. 26 नोव्हेंबर रोजी 'गणपती वप्प मोरियं 'हे ऐतिहासिक पार्श्वभूमीवरील नाटक सादर झाले.**

# वाईट विचार काढून टाकून चांगल्या विचारांचे बीजारोपण

# गणपति वप्प मोरियं



ऐतिहासिक नाटक हे विशिष्ट काळात घडणाऱ्या घटना त्या काळातील सामाजिक बदल यांवर अवलंबून असते. तसेच त्या काळातील राजे, त्यांचे राज्य त्या काळात घडलेल्या महत्त्वाच्या घटना राजकीय व सामाजिक परिस्थिती या सगळ्याचा विचार करून सादरीकरण केले जाते. त्याचप्रमाणे हे नाटक मगधचा चक्रवर्ती सम्राट अशोक याचा इतिहास दर्शवते. नाटकाची सुरुवात पडद्यावरील "शॅडो इफेक्ट" ॲक्टने झाली. हि थोडी वेगळीच तांत्रिक संकल्पना होती.

पाटलीपुत्र राजधानी असताना सम्राटांचा सम्राट,धर्मनायक अशोक मौर्य चक्रवर्ती सम्राटाच्या राज्यात त्या वेळचे भारताचे मूळ नाव जंबुद्वीप होते.बऱ्यापैकी साम्राज्य विस्तार असूनसुद्धा सम्राट अशोक हा समाजातील अनिष्ट रूढी परंपरा न मानणारा, जात-पात नाही तर मानवतेवर विश्वास असणारा आणि धर्माच्या मार्गावर चालणारा राजा तसेच कलिंगचा राजा वर्ण, जाती भेदावर भर देणारा तसेच ब्रह्मवृंदांच्या विचाराधीन आचरण करणारा या नाटकात दिसून आला.

सम्राट राजाने संपूर्ण जम्बुद्वीपाचा सत्याग्रह केल्यानंतर कलिंग राज्याच्या राजाला त्याच्या कन्येच्या विवाहासाठी निवेदन दिले. परंतु पुरोहितांच्या सांगण्यावरून हे निवेदन राजाने धुडकावले. त्याच बरोबर मगधला लागून असलेल्या कलिंग राज्याच्या सीमा बऱ्याच काळापासून अशांत होत्या. मगध मधील व्यापाऱ्यांना वारंवार कलिंगकडून दिला जाणारा त्रास,तसेच सम्राट अशोक धम्म शासन चालवत असल्यामुळे नाराज पुरोहित वर्गाचा त्रास या कारणांमुळे सम्राट राजा युद्धाच्या निर्णयापर्यंत पोहोचला. परंतु वर्षावासामुळे अशोक राजाची युद्धाला पुढे ढकलतो . खरं तर युद्ध हानिकारक असल्याकारणाने हे टळावं असे वाटत असून कलिंगकडून वारंवार चालत असलेल्या करामतींमुळे वर्षावासानंतर हे युद्ध झाले.कलिंग राज्याने सम्राट अशोकाला युद्ध करण्यास प्रवृत्त केले.

**दोन अंकी नाटक**

**"गणपती वप्प मोरियं "**

- लेखक - बाळासाहेब थोरात
- दिग्दर्शक - श्रीकांत मोरे
- नेपथ्य - अमित इंदुलकर, कृपेश राऊत
- प्रकाशयोजना - चेतन पवार
- पार्श्वसंगीत - मकरंद बालाजीवाले
- रंगभूषा - किशोर पिंगळे
- गीते - बाळासाहेब थोरात
- संगीतकार - प्रितेश मांजललकर
- गायक - प्रवीण ढोणे
- नृत्यदिग्दर्शक - संदेश पाटील
- शाडोप्ले - संकेत कोळंबीकर
- निवेदन - संतोष दळवी





**पात्र परिचय**

सम्राट अशोक - प्रमोद दामोदर
खल्लातक (सम्राट अशोकाचा सेनापती निलेश वालझाडे)
राधागुप्त - सम्राट अशोकाचा सल्लागार अविनाश राणे
चैत्रराज - खारवेल राज्याचा (कलिंग राज्याचा) राजा अक्षय पवार
मेघवर्ण आणि तुल्या- भीमराव खेत्रे
राधेय आणि ब्रह्मदत्त - रूपेश इंदुलकर
रुचिका - प्रिय ओव्हाळ
अचल - अनिकेत राणे
अंगरक्षक - संविधान मोरे
भंते - संभाजी शिरसाट
महेंद्र - आर्यन दामोदर
बालभिक्खू - अदित्य चव्हाण
लेखनिक आणि प्रतिवेदक तोपरा - ॲड मिलिंद ढगे
प्रतिवेदक ढवली - प्रताप खैरे
लेखनिक - प्रदीप गायकवाड
सम्राट अशोकाचा रक्षक - संविधान
तेजस्विनी - ऐश्वर्या जाधव पवार
महादेवी विदिशा - संगीता मोहोड
दिती आणि संघमित्रा- दुर्गा भालेराव
चैत्रराजाची राणी आणि सेविका- प्रीती कान्हेरे
गोस्वामी, अंजन , दंडक भारद्वाज, गिरिका - आकाश पवार
वेसवन्न आणि भंते 2 - सुधीर उणवणे
कप्प आणि सेवक- मनोज जाधव

जवळ जवळ १० दिवस चाललेल्या अतोनात मनुष्यहानीत एक लक्ष सैनिक मारले गेले आणि दीड लक्ष अशोक राजाचे कैदी म्हणून बंदीस्त होते. त्यानंतर कलिंग राज्याच्या जनतेची जबाबदारी घेऊन बंदिना धर्मांतरण करण्यास भाग पाडले. तसेच स्वतःही राजाने धर्मांतरण केले. कलिंग राजाच्या उर्वरित जनतेशी संवाद साधताना पडद्यावरील प्रकाश योजनेतून साकारलेली चंद्राची प्रतिकृती आणि रात्रीची निर्मिती सुंदर होती. प्रेक्षकांनाही ते दृश्य विलोभनीय वाटले असेल. नाटकाच्या उत्तरार्धात राजाची युद्धानंतर पश्चातापाची भावना, व स्वतः बौद्ध धर्मात धर्मांतर करून बंदी सैनिकांना बौद्ध धर्मांतरण या कृत्यातून राजाचे मन परिवर्तीत झाल्याच दिसून आले. मग सत्यता,करुणा, अहिंसा, योग्य न्याय निवाडा अशा सामाजिक नैतिक गुणांचे राजाचे आचरण होते. अशा प्रकारे समाजातील वाईट प्रवृत्ती समूळ नष्ट करून चांगल्या प्रवृत्तीच बीज रोवण्यासाठी सम्राट अशोकांची भूमिका लेखक बाळासाहेब थोरात यांनी व दिग्दर्शक श्रीकांत मोरे यांनी मांडली आहे. नाटकातील शॅडो इफेक्ट्स हे वेगळेपण दाखवत होते. परंतु कलावंताची कलाकृती अजून प्रकर्षाने प्रेक्षकांपर्यंत पोहोचू शकली असती.

नाटक म्हटल्यावर नाट्य संगीताची अनुभूती होईल. अशी प्रेक्षकांची अपेक्षा असते. परंतु या नाटकामध्ये नृत्याच सादरीकरण झालं. अशी कुजबूज प्रेक्षकांमध्ये होत होती. सम्राट अशोक व कलिंग राजाच्या युद्धप्रसंगातून निर्माण झालेलं गणपति वप्प मोरियं म्हणजे नक्की काय हे बघण्यासाठी तसेच इतिहासाची आवड असणाऱ्या प्रेक्षकांनी हे नाटक पाहण्यास हरकत नाही.

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

| | |
|---|---|
| Facebook | https://www.facebook.com/jeevandeepnews/ |
| Instagram | https://www.instagram.com/thane_jeevandeep/ |
| X | https://x.com/Jeevandeepvarta |
| www | https://jeevandeepvarta.com/ |

## भविष्यवेध



शुक्रवार
२८ नोव्हेंबर २०२५

**मेष**
तुमचे काम पूर्ण करण्यावर लक्ष केंद्रित कराल आणि तुमचे बहुतेक प्रयत्न यशस्वी होतील. नवीन वाहन खरेदी करण्याबाबत तुम्ही उत्साहित असाल. तुम्हाला वडिलांच्या सेवांचा फायदा होईल आणि

**वृषभ**
त्यांचे आशीर्वाद तुमच्या आयुष्यातील कोणत्याही चालू समस्या सोडवण्यास मदत करतील.व्यवसायात चांगला नफा मिळेल, ज्यामुळे स्वप्ने लवकरच पूर्ण होतील. वैवाहिक जीवन आनंदी राहील .

**मिथुन**
आपल्या व्यावसायिक योजनेबद्दल होकारात्मक दृष्टीकोण प्रदर्शित करा. आजचा दिवस व्यापार क्षेत्रातील चांगली बातमी आणणारा आहे. जुनी कामे झाल्यामुळे उत्साह आणि प्रसन्नता वाटेल.

**कर्क**
अध्यात्मात थोडा वेळ घालवाल, मनाला शांती मिळेल. तुम्हाला दीर्घकाळापासून असलेल्या समस्येतून आराम मिळेल.नवीन रोजगाराच्या संधी मिळतील, ज्यामुळे आर्थिक समस्या सोडवण्यास मदत होईल.

**सिंह**
लाभ प्राप्तिचा योग. व्यापारातील आर्थिक त्रासाला संयमाने सोडवच्याचा प्रयत्न करा. निवेश प्रत्याशित.आपल्या कार्याच्या दरम्यान आपल्या कौटुंबिक ताणांचे स्मरण करून त्यांना कार्यात मिसळू नये.

**कन्या**
घरगुती कामं बराच काळ व्यस्त ठेवतील. धार्मिक आणि अध्यात्मिक हेतू पूर्ण करण्यासाठी आजचा दिवस चांगला आहे. अनियोजित माध्यमातून मिळणारे पैसे तुमचा दिवस उजळून टाकतील.

**तुळ**
जीवनात ध्येयावर लक्ष द्या पूर्ण विश्वासाने त्याच्या प्राप्तीचा प्रयत्न करा.व्यापारात कार्यक्षेत्राचा विकास, व्यापारिक बाधा येऊ शकतात. आय पेक्षा व्यय अधिक असल्याने आर्थिक तंगीची आशंका.

**वृश्चिक**
आपल्या कौटुंबिक ताणांचे स्मरण करून त्यांना कार्यात मिसळू नये. आपल्या ्यावसायिक योजनेबद्दल होकारात्मक दृष्टीकोण प्रदर्शित करा. महत्वपूर्ण कार्यांवर व्यय होईल. हसत खेळत वेळ खर्च होईल.

**धनु**
शारीरिक समस्येपासून मुक्तता मिळेल, ज्यामुळे तुम्हाला आनंद मिळेल. नवीन टप्पा गाठण्यात यशस्वी व्हाल आणि प्रशंसा केली जाईल. तुमचे कनिष्ठ विद्यार्थी देखील शिकण्याचा प्रयत्न करतील.

**मकर**
सामाजिक कार्यात सहभागी व्हाल, ज्यामुळे तुमची प्रतिमा उंचावेल. अविवाहित लोकांना लग्नाचा प्रस्ताव येऊ शकतो. सरकारी योजनेचा लाभ घेण्यास यशस्वी व्हाल.

**कुंभ**
मालमत्तेत गुंतवणूक करण्याची योजना आखू शकता. व्यापार-व्यवसाय सहज राहील. कौटुंबिक सभासदांचा सहयोग मिळेल. यात्रा घडू शकते. अडकलेला पैसा मिळाल्याने आनंद वाटेल.

**मिन**
कौटुंबिक चिंता दूर होईल. व्यावसायिक स्थिति चांगली राहील बळात वाढ होईल. आरोग्य उत्तम राहील. महत्वाच्या कामांसाठी श्रम करावे लागेल. आर्थिक विषयांमध्ये सावगिरी बाळगा.

# कल्याण : श्वान निर्बिजीकरण केंद्रातील गैरप्रकार
# आयुक्तांकडून प्रकाश सोनावणे यांचे निलंबन

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण :** कल्याण डोंबिवली पालिकेच्या कल्याणमधील वैद्यकीय आरोग्य विभागाच्या नियंत्रणाखाली असलेल्या पत्रीपूल येथील श्वान निर्बिजीकरण केंद्रातील गैरप्रकार आणि या केंद्रात श्वानांच्या देखभालीसाठी असलेल्या पुणे येथील मे. जीवरक्षा ॲनिमल वेल्फेअर ट्रस्टने केलेल्या अनियमिततेवर नियंत्रण ठेवण्यास अपयशी आणि हलगर्जीपणा केल्याचा ठपका ठेवत पालिका आयुक्त अभिनव गोयल यांनी या केंद्राचे नियंत्रक बहुद्देशिय कर्मचारी कमलेश प्रकाश सोनावणे यांना बुधवारी पालिका सेवेतून निलंबित केले.

पत्रीपूल येथील श्वान निर्बिजकरण केंद्रात अनेक अनियमितता असून तेथे श्वान निर्बिजीकरण, लसीकरण नावाने श्वानांच्या देखभालीसाठी प्रत्यक्ष सुविधा कमी आणि या केंद्राच्या माध्यमातून लाखो रूपयांची देयके काढण्याचे प्रकार होत होते. हा प्रकार 'लोकसत्ता'ने उघडकीला आणला होता. माहिती कार्यकर्ते मनोज कुलकर्णी यांनी पत्रीपूल येथील श्वान निर्बिजीकरण केंद्रातील गैरव्यवहार, गैरप्रकारांची चौकशी करून या केंद्रातील नियंत्रक कर्मचारी कमलेश सोनावणे यांना निलंबित करण्याची मागणी आयुक्त गोयल यांच्याकडे केली होती.

या श्वान निर्बिजीकरण केंद्रात पालिकेच्या वैद्यकीय आरोग्य विभागातील कोणत्याही वरिष्ठाने कधीही भेट दिली नाही. त्यामुळे या केंद्रात नियंत्रक संस्था मे. जीवरक्षा आणि नियंत्रक कर्मचारी सोनावणे यांचा मनमानी कारभार सुरू होता. शहरातील भटके श्वान पकडण्यात हलगर्जीपणा केला जात होता. केंद्रात दररोज ४० श्वानांच्या नसबंदी, निर्बिजीकरणाच्या शस्त्रक्रिया केल्या जात होत्या. प्रत्यक्षात तशी कोणतीही माहिती नियंत्रक संस्थेने दिली नव्हती. केंद्रात श्वान निर्बिजीकरणासाठी प्रत्यक्ष कोण डॉक्टर काम करतो. कोणाच्या नावे वेतन काढले जाते याचा कोणताही धरबंध नव्हता.

या केंद्रातील विविध प्रकारच्या खर्चाची ३० ते ३५ लाखाची देयके सोनावणे यांच्याकडून काढण्यात येत होती. श्वान पकडण्याच्या वाहनांवर जीपीएस यंत्रणा नव्हती. दिवसभरात किती श्वान शहरातून पकडून आणले याची कोणतीही माहिती उपलब्ध होत नव्हती. नागरिकांनी परिसरातील पिसाळलेले श्वान पकडून नेण्याची तक्रार पालिकेत केली की या केंद्राकडून आमच्याकडे एकच वाहन श्वान पकडण्यासाठी आहे, असे साचेबध्द उत्तर आरोग्य विभागाचे कर्मचारी देत होते.

# नागरिकांना प्रचारकांच्या टकटकीचा त्रास

## अंबरनाथमधील गृहसंकुलात राजकीय पक्षांचा प्रवेश रोखला ?

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**अंबरनाथ :** अंबरनाथ आणि कुळगाव बदलापूर नगरपालिका निवडणुकीत प्रचारासाठी अवघे काही दिवस उरले असतानाच प्रचाराचा जोर वाढला आहे. घरोघरी जाऊन मतदारांकडे मताचा जोगवा मागितला जातो आहे. मात्र काही ठिकाणी मतदार उमेदवारांना, तुम्हालाच मत देतो, पण प्रचार थांबवा अशी विनंती करताना दिसत आहेत. काही ठिकाणी थेट लढती असल्या तरी अनेक ठिकाणी तिरंगी, चौरंगी लढती आहेत. अशा ठिकाणी दररोज प्रचारकांची एक फेरी होत असल्याने नागरिकांना प्रचारकांच्या टकटकीचा त्रास होऊ लागला आहे. अंबरनाथच्या एका गृहसंकुलात तर एकदाच काय तो प्रचार करा अशा आशयाचे पत्र देत राजकीय पक्षांचा वारंवार होणारा प्रवेश रोखला आहे.

कुळगाव बदलापूर आणि अंबरनाथ नगरपालिकेच्या निवडणकांसाठी येत्या २ डिसेंबर रोजी मतदान होणार आहे. गेल्या साडे दहा वर्षात या शहरांत पालिकेची निवडणूक झालेली नाही. यानंतर या दोन्ही नगरपालिकांची महापालिका होण्याची दाट शक्यता आहे. त्यामुळे नगरपालिका स्तरावरील ही शेवटची निवडणूक असल्याने सर्वच माजी नगरसेवक, ज्येष्ठ नगरसेवक पालिका सभागृहात जाऊ इच्छितात. त्यामुळे अनेकांनी प्रभाग आरक्षण जाहीर झाल्यापासून प्रचाराला सुरूवात केली. अर्ज भरल्यानंतर या प्रचाराला जोर आला आहे. त्यामुळे दररोज प्रभागातील घरांमध्ये उमेदवार, त्यांचे कार्यकर्ते प्रचार करत आहेत. अंबरनाथ आणि बदलापुरातील बहुतांश प्रभागात दुरंगी किंवा तिरंगी लढत आहे. मात्र त्यापेक्षा अधिक उमेदवार असलेले प्रभागही आहेत. अनेक वर्षांनंतर यंदा द्विसदस्यीय प्रभाग आहेत. तर थेट नगराध्यक्ष पदासाठीही मतदान करायचे आहे.



सध्या प्रत्येक प्रभागात दररोज पाच ते सहा उमेदवार, त्यांच्या कार्यकर्त्यांसह घराघरांत जात प्रवास करत आहेत. घराची घंटी वाजवल्यानंतर दारात दोन उमेदवारांसह कार्यकर्त्यांचा गराडा असतो. एका उमेदवाराचा प्रचार सुरू असतानाच दुसऱ्याचा उमेदवाराचे प्रचार पथक दार ठोठावू लागते. मोठ्या आवाजातील प्रचारगाड्या, घोषवाक्ये, साउंड सिस्टिम, सतत वाजणारे संगीत आणि कार्यकर्त्यांची लगबग यामुळे गृहसंकुलांतील शांतता पूर्णपणे भंग झाली आहे. याचा सर्वाधिक त्रास विद्यार्थ्यांना, घरून काम करणाऱ्यांना, ज्येष्ठ नागरिकांना आणि आजारी व्यक्तींना होत आहे. त्यामुळे अनेक मतदारांनी उमेदवारांना विनंती केली आहे की तुम्हालाच मत देतो पण आता प्रचार थांबवा. अनेकांनी तर दिवसभरची दाराची बेल बंद ठेवण्याचा मार्ग स्वीकारला आहे. अनेक ठिकाणी उमेदवारांचा गराडा पाहून दार उघडण्याकडे दुर्लक्ष केल्याचेही दिसून आले आहे. प्रचारामुळे त्रस्त झालेल्या अंबरनाथ पूर्वेतील निसर्ग ग्रीन या गृहसंकुलाने तोडगा काढत अनोखा निर्णय घेतला आहे. त्यांनी सर्व राजकीय पक्षांना पत्रकाद्वारे विनंती केली आहे. पूर्वपरवानगीने फक्त एकदाच प्रचार करण्यास परवानगी दिली जाईल, असे त्यात नमूद केले आहे. यामुळे रहिवाशांना प्रचाराच्या भडीमारापासून मुक्तता मिळाली असून शांतता पुन्हा प्रस्थापित झाली आहे, असे येथील एका रहिवाशाने सांगितले आहे.

# वाहतुक कोंडी सोडविण्यात प्रशासन अपयशी

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे जिल्हा हा औद्योगिक आणि लोकवस्ती अशा दोन्ही वसाहतींमध्ये मोडतो. भिवंडी, नवी मुंबई, ठाणे येथील वागळे इस्टेट, डोंबिवली, बदलापूर, अंबरनाथ भागात औद्योगिक आणि नागरी वसाहत आहे. त्यामुळे जड अवजड वाहनांची वाहतुक जिल्ह्यात नित्त्याची आहे. अवजड वाहनांसाठी ठाणे वाहतुक पोलिसांनी आयुक्तालय क्षेत्रात अर्थात ठाणे, डोंबिवली, कल्याण, उल्हासनगर, अंबरनाथ, बदलापूर आणि भिवंडी शहरात दुपारी आणि मध्यरात्रीच प्रवेश दिला असून त्यास वेळा निश्चित केल्या आहेत.**

**ठाणे :** ठाणे जिल्ह्यात गेल्याकाही वर्षापासून वाहतुक कोंडीची बिकट समस्या निर्माण झाली आहे. विशेषतः ठाणे शहरात एखाद्या व्यक्तीला घर घ्यायचे असल्यास त्या व्यक्तीच्या डोळ्यासमोर ठाणे शहरातील अपुरी सार्वजनिक वाहतुक सुविधा आणि भीषण वाहतुक कोंडीचे चित्र उभे राहते. ठाणे वाहतुक शाखेचे पोलीस उपायुक्त पंकज शिरसाट यांनी ठाणेकरांना अजब सल्ला देत प्रदूषण आणि कोंडी टाळण्यासाठी सार्वजनिक वाहतुक व्यवस्थेचा अवलंब करा असे आवाहन केले. परंतु ठाण्यात जे नागरिक सार्वजनिक वाहतुक व्यवस्थेचा वापर करतात. त्यांच्या पदरी हालअपेष्टाच दिसत आहेत. त्यामुळे इतर नागरिकांनी सार्वजनिक वाहतुक व्यवस्थेचा पर्याय निवडल्यास गंभीर स्थिती निर्माण होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

ठाणे शहरातून वाहतुकीसाठी घोडबंदर, मुंबई नाशिक महामार्ग, मुंब्रा बाह्यवळण, ठाणे-कशेळी भिवंडी हे मार्ग जातात. मागील काही वर्षांमध्ये यातील घोडबंदर आणि मुंबई नाशिक महामार्गावर दररोज सकाळी आणि रात्रीच्या वेळेत वाहतुक कोंडीचा सामना नागरिकांना सहन करावा लागतो. या मार्गांवर मेट्रो मार्गिका निर्माणाची कामे, घोडबंदर सेवा रस्ता मुख्य मार्गास जोडणे, मुंबई नाशिक महामार्गाचे रुंदीकरण करणे, महामार्गावरील साकेत पूल ते कोपरी आनंदनगर उन्नत मार्गाच्या निर्माण अशी महत्त्वाच्या प्रकल्पांची कामे सुरु आहेत. त्यामुळे रस्ते अरुंद होत आहेत. एकापाठोपाठ एक प्रकल्पांची कामे आणि दुसरीकडे वाहतुक कोंडी सोडविण्यास अपयशी ठरलेले प्रशासन यामुळे नागरिक हैराण झाले आहे. याच दरम्यान ठाणे वाहतुक शाखेचे पोलीस उपायुक्त पंकज शिरसाट यांनी नागरिकांना सार्वजनिक वाहतुक व्यवस्थेचा वापर करण्याचा सल्ला दिला आहे. परंतु ठाण्याची वाहतुक व्यवस्था अत्यंत कोलमडलेल्या अवस्थेत आहे.

**सध्याची वाहतुक व्यवस्थेची स्थिती काय?**

ठाणे परिवहन सेवेच्या टीएमटी बसगाड्यांसाठी ठाणे रेल्वे स्थानक परिसरातील सॅटीस पुलावर थांबा आहे. या प्रत्येक थांब्यावर सकाळ आणि रात्रीच्या वेळेत प्रवाशांची प्रचंड गर्दी असते. रांगांमध्ये प्रवाशांचा जवळपास अर्धा ते पाऊण तास प्रवाशांचा वाया जातो. अनेकदा बसगाडीमध्ये बसून प्रवास देखील होत नाही. शहरातील टीएमटीच्या इतर बसगाडी थांब्यावरही प्रवाशांना वेळेत बसगाड्या उपलब्ध होत नाहीत.



# उरणच्या हवा प्रदूषणात वाढ

## सर्दी-खोकला आणि श्वसनाच्या आजारात वाढ

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**उरण :** गेल्या आठवड्यात थंडीची सुरुवात झाली होती. मात्र अचानक पुन्हा तापमानात वाढ झाल्याने हवा प्रदूषणातही वाढ झाली असून यामुळे सर्दी-खोकला आणि श्वसनाच्या आजारात वाढ झाली आहे. या वाढत्या प्रदूषणाचा सामना करण्यासाठी नागरिकांकडून मुखपट्टीचा वापर केला जात आहे. उरणला जोडणाऱ्या आम्र मार्ग ते जेएनपीए तसेच जेएनपीए ते पळस्पे या दोन्ही राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ३४८ व ३४८ अ वर मोठ्या प्रमाणात धूळ निर्माण होत आहे. त्यामुळे धुळीचे लोट उसळू लागले आहेत. त्याचप्रमाणे उरण तालुक्यातील अंतर्गत नवघर फाटा ते उरण चारफाटा व द्रोणागिरी नोड, खोपटे कोप्रोली या मार्गावर ही धुळीच्या मार्गातून प्रवास करावा लागत आहे.

तर राष्ट्रीय महामार्गावर जासई ते गव्हाण फाटा, गव्हाण फाटा ते बंबावी पाडा परिसरातील मार्गावर धुळीचे लोट वाढू लागले आहेत. त्यामुळे उरण पनवेल महामार्गावरील प्रदूषणात वाढ झाली आहे. वाढत्या धूलिकणामुळे उरण पनवेल मधील हवेची मात्रा वाईट पातळीवर पोहचली आहे. येथील हवेची मात्रा १५० ते १७५ पार हवा गुणवत्ता निर्देशांक जाऊ लागला आहे. ही मात्रा सातत्याने वाढत्या क्रमांकात आहे.

# पेणमध्ये अनधिकृत हातगाड्यांचा सुळसुळाट

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**पेण, ता. २६ (वार्ताहर) :** मुंबईपासून जवळच असलेल्या आणि रायगड जिल्ह्यातील प्रमुख बाजारपेठ असलेल्या पेण शहरात दिवसेंदिवस लोकसंख्या वाढत आहे. या वाढत्या नागरीकरणासोबतच शहरातील अरुंद रस्ते आणि अपुरी सुविधा हा गंभीर प्रश्न बनला आहे. त्यातच अनधिकृत हातगाड्यांची संख्या मोठ्या प्रमाणात वाढल्याने नागरिकांच्या दैनंदिन जीवनात अडथळे निर्माण होत आहेत.

विशेषतः शहरातील मुख्य रस्त्यांवरील फुटपाथ तसेच उपजिल्हा रुग्णालयाच्या परिसरात मोठ्या प्रमाणावर हातगाड्या लावल्या जात असल्याने पादचाऱ्यांना चालणे कठीण झाले आहे. वृद्ध नागरिक, महिला आणि विद्यार्थ्यांना रस्त्यावर उतरून चालावे लागत असल्याने अपघाताचाही धोका वाढला आहे. पेण हा व्यापारासाठी महत्त्वाचा केंद्रबिंदू असल्याने ग्रामीण भागातून तसेच अन्य तालुक्यांमधून मोठ्या प्रमाणावर नागरिक येथे खरेदी-विक्रीसाठी येतात. त्यामुळे बाजारपेठ नेहमीच गजबजलेली असते. परंतु अपुरे पार्किंग, अरुंद रस्ते आणि बेशिस्तपणे लावण्यात येणाऱ्या हातगाड्यांमुळे वाहतूक कोंडीचा प्रश्न दिवसेंदिवस गंभीर होत आहे. याबाबत नागरिकांकडून वारंवार तक्रारी केल्या जात असून, नगरपालिका प्रशासनाने तत्काळ कारवाई करावी, अशी मागणी जोर धरू लागली आहे.

### हातगाड्यांवर कारवाई होणार

**यासंदर्भात पेण नगरपालिकेचे अतिक्रमण नियंत्रण विभागाचे अधिकारी महेश वडके यांनी सांगितले, की शहरातील मुख्य रस्ते, फुटपाथ तसेच रुग्णालय परिसरात अनधिकृतपणे उभ्या करण्यात आलेल्या हातगाड्यांवर निश्चितपणे कडक कारवाई केली जाईल. सध्या नगरपालिकेच्या निवडणूक प्रक्रियेमुळे कारवाईला विलंब झाला असून, निवडणुका संपताच या अनधिकृत हातगाड्यांवर तत्काळ कार्यवाही करण्यात येईल, असे त्यांनी स्पष्ट केले.**

**बॅग तपासणी यंत्र आठवडाभरापासून बंद**

# वसई विरार मनपा मुख्यालयाच्या सुरक्षेवर प्रश्नचिन्ह



दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**वसई :** वसई विरार महापालिकेच्या मुख्यालयात सुरक्षेच्या दृष्टीने ये जा करणाऱ्या नागरिकांची बॅग तपासण्याकरीता बॅग तपासणी यंत्रणा बसविण्यात आली आहे. मात्र गेल्या आठवडाभरापासून हे बॅग तपासणी यंत्र बंद आहे. त्यामुळे महापालिकेच्या कार्यालयीन सुरक्षेबाबत प्रश्नचिन्ह उपस्थित केले जात आहे. विरार पश्चिमेच्या यशवंत नगरमध्ये वसई विरार महापालिकेचे मुख्यालय आहे. पालिकेचे हे मुख्यालय ७ मजली असून एकूण क्षेत्रफळ ३ लाख चौरस फूट एवढे प्रशस्त आहे. मुख्यालयाच्या इमरातीसाठी २०० कोटीं रुपये तर बांधकामांसाठी ४५ कोटी रुपये खर्च आले आहेत. या इमारतीत आयुक्तांसह सर्व प्रमुख अधिकाऱ्यांचे सुसज्ज दालन, सभागृह, स्थायी समिती सभागृह, कॅण्टीन, अभ्यागत कक्ष, आहे. या मुख्यालयातील पहिल्या दोन मजल्यावर परिवहन भवन तर ३ ते ७ मजल्यामध्ये मुख्यालय विस्तारले आहे.

वसई विरार शहरातील मुख्य प्रशासकीय कार्यलयांपैकी एक म्हणजे वसई विरार महापालिका. त्यामुळे पाणीपुरवठा, आरोग्यसुविधा, शासनाच्या विविध योजना, रस्ते तसेच गटारांची दुरुस्ती व अशा विविध प्रकारच्या सोयीसुविधांसंबंधी चौकशी आणि तक्रारी करण्यासाठी तसेच इतर महत्त्वाच्या शासकीय कामांसाठी या मुख्यालयात दररोज मोठ्या संख्येने नागरिक येत जात असतात.

या दरम्यान नागरिकांच्या तसेच मुख्यालयातील कर्मचाऱ्यांच्या सुरक्षेसाठी सीसीटीव्ही कॅमेरे, बॅग तपासणी यंत्रणा, मेटल डिटेक्टर अशा विविध सुरक्षा यंत्रणा या भागात बसविण्यात आल्या आहेत. तसेच महापालिका मुख्यालयाच्या प्रवेशद्वारावर तसेच आवारात सुरक्षारक्षक तैनात करण्यात आले आहेत.

# उल्हासनगर : मतदार यादीत मोठा घोळ

## अंतिम तारीख उलटून 64 नव्या नावांचा समावेश!

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**उल्हासनगर :** उल्हासनगर महापालिकेच्या निवडणुकीत मतदार यादीत मोठा घोळ समोर आला असून, १ जुलै २०२५ ही अंतिम तारीख असतानाही त्यानंतर ६४ नव्या नावांचा समावेश झाल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. या संदर्भात मनसे नेते सचिन कदम यांनी गंभीर अनियमिततेचा आरोप करत राज्य निवडणूक आयोगाला थेट सवाल केला आहे. या उघडकीमुळे उल्हासनगरमधील निवडणूक प्रक्रियेच्या पारदर्शकतेवरच प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

राज्यातील २९ महानगरपालिकांच्या सार्वत्रिक निवडणुकांसाठी मतदार यादी तयार करण्याचा कार्यक्रम राज्य निवडणूक आयोगाने जाहीर केला होता. त्यानुसार १ जुलै २०२५ पर्यंत असलेली मतदार यादीच निवडणुकांसाठी ग्राह्य धरण्यात आली. मात्र, उल्हासनगर महापालिकेच्या यादीत या नियमाला हरताळ फासल्याचे चित्र समोर आले आहे. अलीकडेच आयोगाने सर्व २९ महापालिकांच्या प्रारूप मतदार याद्या जाहीर केल्या असून, त्यात उल्हासनगरची यादी प्रसिद्ध होताच मनसे नेत्यांनी तिचा सखोल अभ्यास केला. कदम यांच्या म्हणण्यानुसार, १७ ते २१ नोव्हेंबर २०२५ या केवळ पाच दिवसांत ६४ नवी नावे मतदार यादीत समाविष्ट झाल्याचे स्पष्ट झाले आहे. १७ नोव्हेंबरला दाखल झालेला अर्ज केवळ एका दिवसात पडताळणीसह मंजूर होऊन नाव यादीत समाविष्ट झाल्याचा आरोप त्यांनी केला.

हे कारवाईचे संशयास्पद वेगवान स्वरूप असून, "नियम मोडून अंतिम तारखेनंतर नावे कशी काय समाविष्ट झाली? हा प्रकार नेमका कोणाच्या आदेशाने झाला?" असा सवाल कदम यांनी उपस्थित केला. प्रभाग क्रमांक १३ मधील मतदार यादीची पाहणी करताना या सर्व ६४ नव्या नावांची नोंद स्पष्ट दिसून येत असल्याचं कदम यांनी नमूद केलं आहे. त्यामुळे हा प्रकार तांत्रिक चूक नसून गंभीर अनियमिततेचा भाग असण्याची शक्यता अधिक गडद झाली आहे. या प्रकरणामुळे मतदार यादीची विश्वासार्हता आणि संपूर्ण निवडणूक प्रक्रियेची पारदर्शकता धोक्यात आली असून, राजकीय आणि प्रशासकीय वर्तुळात मोठी खळबळ उडाली आहे.




**कल्याण डोंबिवली महानगरपालिका**

महापालिका प्रशासकीय इमारत, शंकरराव चौक, कल्याण (पश्चिम)

**कल्याण डोंबिवली महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक-२०२५**

**मतदार यादी प्रसिद्धीची सुधारीत सूचना**

कल्याण डोंबिवली महानगरपालिका हद्दीतील नागरीकांना व सर्व संबंधितांना याद्वारे कळविण्यात येते की, मा. राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र यांचेकडील पत्र क्रमांक रानिआ/मनपा-२०२५/प्र.क्र.४१/का-५, दि.१३/११/२०२५ अन्वये कल्याण डोंबिवली महानगरपालिकेची सार्वत्रिक निवडणूक २०२५ करीता प्रभाग मतदार यादी प्रसिध्दीचा कार्यक्रम दिनांक २०/११/२०२५ रोजी प्रसिद्ध करण्यात आला होता. त्यानुसार दिनांक २०/११/२०२५ रोजी प्रारुप प्रभागनिहाय मतदार याद्या प्रसिद्ध करण्यात आलेल्या आहेत. तथापि, मा. राज्य निवडणूक आयोग महाराष्ट्र यांनी क्रमांक रानिआ/मनपा-२०२५/प्र.क्र.४१/का-५, दि.२६/११/२०२५ रोजीच्या पत्रान्वये मतदार यादीच्या कार्यक्रमात बदल केला असून सुधारीत कार्यक्रम खालीलप्रमाणे घोषित केला आहे.

| अ.क्र. | निवडणुकीचा टप्पा | दि.१३/११/२०२५ च्या पत्रानुसार निर्धारित केलेला दिनांक | सुधारीत दिनांक |
|---|---|---|---|
| १ | प्रारुप मतदार यादीवर हरकती व सूचना दाखल करण्याचा अंतिम दिनांक | २७/११/२०२५ | ०३/१२/२०२५ |
| २ | प्रारुप मतदार यादीवर दाखल हरकतीवर निर्णय घेऊन प्रभागनिहाय अंतिम मतदार याद्या अधिप्रमाणित करुन प्रसिध्द करणे | ०५/१२/२०२५ | १०/१२/२०२५ |

उपरोक्त सुधारीत तारखेनुसार प्रारुप मतदार यादींवर हरकती ह्या दि. ०३/१२/२०२५ पर्यंत सकाळी १०.०० ते दुपारी ३.०० या वेळेत संबंधित प्रभाग क्षेत्र कार्यालय येथे स्विकारण्यात येतील, याची नोंद घ्यावी.

**ठिकाण: कल्याण**
**दिनांक: २७/११/२०२५**

**कडोंमपा/जसंवि/मुका/७१६**
**दि. २७/११/२०२५**

**सही/-**
**(अभिनव गोयल) भा.प्र.से.**
**आयुक्त तथा निवडणूक अधिकारी,**
**कल्याण डोंबिवली महानगरपालिका.**

# मतदार याद्यांची छाननी करण्यासाठी अतिरिक्त मुदतवाढ द्या

## - ठाकरे गटाची आयुक्त सौरभ राव यांच्याकडे मागणी



दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे :** पालिका निवडणुकीसाठी ठाणे पालिकेने प्रारूप मतदार याद्या जाहीर केल्या खऱ्या. मात्र या मतदार याद्यांमध्ये गंभीर चुका असल्याचे वारंवार समोर आल्या आहेत. त्यामुळे प्रारूप मतदार याद्यांची छाननी करण्यासाठी किमान १५ दिवसांची अतिरिक्त मुदतवाढ तत्काळ जाहीर करावी अशी मागणी आज शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाच्यावतीने ठाणे महापालिका आयुक्त सौरभ राव यांच्याकडे केली आहे. एका प्रभागातील मतदार दुसऱ्या प्रभागात, मतदार याद्यांमध्ये पारदर्शकता नसल्याच्या गंभीर चुका समोर आल्या आहेत. याची दखल घेवून कल्याण ग्रामीण विधानसभा प्रमुख ॲड. रोहिदास मुंडे, दिवा शहरप्रमुख सचिन पाटील, विभागप्रमुख चेतन पाटील यांनी मतदार याद्यांचा छाननी कालावधी वाढवण्याची मागणी केली आहे.

ठाणे ■ शुक्रवार
२८ नोव्हेंबर २०२५
दैनिक ठाणे
जीवनदीप वार्ता



# पेण येथे सह्याद्री प्रतिष्ठानतर्फे शहिदांना वाहिली श्रद्धांजली

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**पेण** : २६ नोव्हेंबर २००८ हा दिवस भारतासाठी काळा दिवस ठरलेला असल्याने मुंबई अतिरेकी हल्ला आणि त्यात मृत्युमुखी पडलेल्या ३४ परदेशी नागरिकांच्या सहित एकूण १९७ जण मारले गेले आणि ८०० हून अधिक जखमी झाले असा हा शहिदांना श्रद्धांजली वाहण्याचा दिवस.

आज या दिवसाचे औचित्य साधून सह्याद्री प्रतिष्ठान हिंदुस्थान तर्फे महात्मा गांधी वाचनालय पेण येथे शहीदांना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. यावेळी पेण पोलिस निरीक्षक संदीप बागुल सह्याद्री प्रतिष्ठानचे समीर म्हात्रे, वाचनालयाचे अध्यक्ष अरविंद वनगे सुहास पाटील अशोक मोकल प्रविण पाटील अशोक जैन यांच्यासह अनेक पेणकर व,सह्याद्री प्रतिष्ठान हिंदुस्थान पेणचे सभासद मोठ्या संख्येने उपस्थित होते.



## शिवसेना उपनेते विजय साळवी यांच्याहस्ते
# राष्ट्रीय पॉवरलिफ्टर अंजली भिलवारे हिचा सन्मान



**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**कल्याण** : राष्ट्रीय पॉवरलिफ्टर अंजली भिलवारे श्रीलंका, कोलंबो येथे दिनांक २७ ते ३० नोव्हेंबर २०२५ दरम्यान होणाऱ्या "वर्ल्ड चॅम्पियनशिप-पॉवरलिफ्टिंग, बेंच प्रेस व डेडलिफ्ट" या जागतिक स्पर्धेत "भारताचे प्रतिनिधित्व " करणार आहे. तीला शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षातर्फे उपनेते विजय साळवी यांच्याहस्ते पंचवीस हजार रूपये आर्थिक सहकार्य करण्यात आले. अंजलीला शाल, श्रीफल, पुष्पगुच्छ देऊन सत्कार करून स्पर्थेसाठी शुभेच्छा देण्यात आल्या.

# जेष्ठ नागरीक संघाच्या वतीने जोस्ना सोनटक्के यांचा सत्कार



**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**वाशिंद** : जेष्ठ नागरीक संघ सेंट्रल, भिवंडी यांच्या वतिने सौ. जोस्ना जयंत सोनटक्के यांचा सत्कार करून पुढील वाटचाली साठी सुभेच्छा दिल्या.

सौ. जोस्ना सोनटक्के या ठाणे-पालघर जिल्हा वैश्य समाजाचे माजी अध्यक्ष जयंत सोनटक्के या पत्नी आहेत. वैश्य समाजा बरोबर ईतर समाजातील अनेक विद्यार्थी घडविण्याचे काम या दापंत्याने केले आहे. अनेक सामाजिक व धार्मीक कामात हे दांपत्य सहभागी होत असल्याने ते सुपरीचित आहेत. बुधवार दि. 26 नोव्हेंबर रोजी जेष्ठ नाकरीक संघाच्या मासिक सभेत सौ. सोनटक्के यांचा वाढदिवसा निमित्त सत्कार करण्यात आला. या वेळी महिंद्र नंदकुमार मुंढे यांनी कनडा येथील आपले अनुभव कथन केले. या वेळी जेष्ठ नागरीक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# किरकोळ वादातून पत्नीची हत्या
## कोळेगाव परिसरात धक्कादायक घटना

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**कल्याण** : डोंबिवलीतील कोळेगाव परिसरात बुधवारी सकाळी एक धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. किरकोळ वादातून पतीने पत्नीची गळा आवळून हत्या केली असून आरोपी पती सध्या फरार आहे. मृत महिलेचे नाव ज्योती धाहीजे असे आहे.

प्राथमिक माहितीनुसार पती–पत्नीमध्ये काल रात्री किरकोळ कारणावरून वाद झाला. वाद चिघळताच आरोपी पोपट धाहीजे याने संतापाच्या भरात पत्नीचा गळा आवळून तिची हत्या केल्याची माहिती समोर येत आहे. घटनेनंतर घरातून पळ काढत आरोपी पसार झाला असून, मानपाडा पोलिसांनी पोपट धाहीजे, याच्या शोधासाठी तपासाचे चक्र फिरवले आहे. परिसरातील सीसीटीव्ही फुटेज, संभाव्य ठिकाणे आणि परिचित लोकांकडून माहिती घेत पोलिस पथक आरोपीचा शोध घेत आहे. या घटनेमुळे कोळेगाव परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले असून घटनेचा पुढील तपास मानपाडा पोलिसांकडून सुरू आहे.

# निरंकारी भक्तांचे उत्स्फूर्त रक्तदान

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**कल्याण** : नर सेवा,नारायण पूजा या निरंकारी मिशनच्या शिकवणीचा प्रत्यय प्रत्यक्ष कृतीतून घडवत संत निरंकारी सत्संग भवन, नारिंगी विरार येथे रविवारी आयोजित भव्य रक्तदान शिबिरामध्ये सुमारे 313 भक्तगणांनी उस्फूर्तपणे रक्तदान केले. आपल्या सामाजिक व मानवतावादी सेवांची परंपरा निरंतर जपत याआधी देखील संत निरंकारी चॅरिटेबल फाउंडेशन तर्फे सप्टेंबर व ऑक्टोबर महिन्यात मुंबई व उपनगरात विविध ठिकाणी भव्य रक्तदान शिबिरांचे आयोजन करण्यात आले होते.

या शिबिरातील रक्त संकलनाचे कार्य नायर हॉस्पिटल रक्तपेढी, संत निरंकारी रक्तपेढी व सर जे.जे. हॉस्पिटल रक्तपेढी यांच्यामार्फत संयुक्तरित्या करण्यात आले. यातील नायर हॉस्पिटल रक्तपेढी मार्फत 101, संत निरंकारी रक्तपेढी मार्फत 121 व सर जे.जे.हॉस्पिटल रक्तपेढी मार्फत 91 युनिट रक्त संकलन करण्यात आले.

याप्रसंगी निरंकारी मिशनच्या भक्तगणांची व सेवादल स्वयंसेवकांची उपस्थिती लक्षणीय होती. यात प्रामुख्याने वसई-विरार शहर महानगरपालिकेचे प्रथम महापौर राजीव पाटील यांचा समावेश होता. मंडळाचे स्थानिक ब्रँचचे प्रबंधक, सेवादल अधिकारी तसेच सर्व सेवादल स्वयंसेवक यांच्या एकत्रित प्रयत्नाने सदर रक्तदान शिबिर यशस्वीरित्या पार पडले.

# उल्हासनगरमध्ये ड्रग्ज रॅकेट
## १७४ नशेच्या बाटल्या जप्त | हिललाइन पोलिसांकडून कारवाई

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**उल्हासनगर** : उल्हासनगरमध्ये पुन्हा एकदा हिललाइन पोलिसांनी नशेच्या रॅकेटप्रकरणी मोठी कारवाई केली आहे. हाजी मलंग रोडवरील काकडवाल गावात केलेल्या सर्च ऑपरेशनमध्ये पोलिसांनी विविध कंपन्यांच्या तब्बल १७४ नशेच्या बाटल्या जप्त केल्या आहेत. जप्त मालाचे बाजारमूल्य ४६ हजार रुपये असून, या कारवाईमुळे परिसरात सक्रिय असलेल्या ड्रग्जमाफियांच्या मुसक्या आवळण्याच्या दिशेने पोलिसांनी एक महत्त्वपूर्ण पाऊल उचलले आहे.

हिललाइन पोलिस ठाण्याच्या हद्दीतील या कारवाईत पोलिसांनी जितेंद्र ऊर्फ जितू ज्ञानदेव पावशे याला ताब्यात घेतले आहे. नेवाळी नाका परिसरात राहणारा पावशे हा अनेक महिन्यांपासून झोप आणि नशा निर्माण करणाऱ्या बाटल्यांची विक्री करीत असल्याची माहिती पोलिसांना मिळाली होती. पोलिस हवालदार संदीप चव्हाण यांनी याप्रकरणी तक्रार नोंदवली असून, पावशेविरुद्ध हिललाइन पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

### आंतरराज्यीय कनेक्शन ?

मिळालेल्या माहितीनुसार, जप्त केलेली ही उत्पादने यापूर्वी देहरादून (उत्तराखंड) आणि चंडीगड यांसारख्या राज्यांतही जप्त करण्यात आली होती. यामुळे या रॅकेटचे आंतरराज्यीय कनेक्शन असल्याची शक्यता बळावली आहे.

टोळी सक्रिय असल्याचा संशय आरोपी पावशे हाजी मलंग रोड-नेवाळी नाका परिसरातील व्यसनाधीन व्यक्तींना या बाटल्या विकत असे. या कारवाईमुळे पुरवठा साखळीतील एक दुवा तुटला असला तरी या रॅकेटच्या मागे मोठा गट सक्रिय असल्याची पोलिसांना शक्यता आहे. आगामी काही दिवसांत या नेटवर्कचा अधिक तपास करण्यात येत असून, आणखी आरोपींना अटक होण्याची शक्यता वर्तविली जात आहे.

# बिन कामाचे गटार काढून ठेकेदाराने रस्ता केला अरूंद
## सर्विस रोड मोठा करण्याची विद्यानगर रहिवाशांची मागणी

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**मुरबाड** : सध्या मुरबाड बस स्थानका समोर उड्डाणपुलाचे काम सुरू आहे. सुरूवातीला जोमाने सुरु असलेले काम गेले अनेक दिवस संथ गतिने सुरु असल्याने त्याचा त्रास मुरबाडकरांना होत असून अनेक ठिकाणी वाहतुकीची कोंडी होत आहे त्याच बरोबर प्रचंड धुळीच्या त्रासाही सामोरे जावे लागत आहे.



उड्डाण पुलाच्या दोन्ही बाजुला तसेच माळशेज घाटाकडे जाण्यासाठी म्हणजे पुर्वेकडे जाण्यासाठी जो सर्विस रोड ठेवला आहे तो अत्यंत लहान असून स्थानिक वाहतूक याच रस्त्याने होणार आहे. असे असताना दोन मोठी वाहने सुद्धा या रस्त्यावर पास होणार नाहीत. शिवाय सदर ठेकेदाराने विद्यानगर पासुन जे गटार बनविण्याचे जे काम सुरू केले आहे त्या गटाराचा कोणताच फायदा होणार नसून बाजुला जागा असतानाही गटार छोटा का घेतला आहे शिवाय त्यामुळे रस्ता अरूंद झाला असून विद्यानगर परिसरातील अनेक शाळेय विद्यार्थी, महिला, जेष्ठ नागरिक, याच रस्त्याने मुरबाड बाजारपेठेत ये- जा करत असतात. अशा वेळी रस्ता लहान असल्याने या ठिकाणी मोठा अपघात होण्याची शक्यता नाकारता येत नाही व शिवाय बनवलेल्या गटाराने पाणी वाहून जाण्यासाठी कोणताच उपयोग होणार नसल्याचे दिसत असून हा गटार काढून टाकावा व रस्ता मोठा करावा अशी मागणी विद्यानगर परिसरातील नागरिकांनी केली आहे.

दरम्यान या सर्व बाबीकडे व ठेकेदाराच्या मनमानी कडे संबंधित राष्ट्रीय महामार्गाचे अधिकारी लक्ष देतात की नाही असा सवाल सुज्ञ मुरबाडकर करत आहेत.

# पालवी प्रकल्पाचे यशस्वी हस्तांतरण

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**पेण** : गेल्या तीन वर्षांपासून राबविण्यात आलेल्या एमजीएल विद्या पालवी प्रकल्पाचा हस्तांतर कार्यक्रम २५ नोव्हेंबर रोजी माणगाव येथे उत्साहात पार पडला. प्रकल्पा मार्फत पूर्वप्राथमिक बालशिक्षणाचे काम तालुक्यातील २४० अंगणवाड्यांपर्यंत यशस्वीरीत्या पोहोचले आहे. या उपक्रमाचा पुढील काळातील कार्यान्वयन स्थानिक आयसीडीएस प्रणालीमार्फत चालू राहावा, या उद्देशाने तालुक्यातील सर्व अंगणवाडी सेविका, पर्यवेक्षिका आणि बालविकास प्रकल्प अधिकाऱ्यांच्या उपस्थितीत हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला.

या कार्यक्रमाला गॅस लिमिटेडचे चीफ मॅनेजर सुशांता राऊत, सुनील रणखांबळे आणि सहाय्यक व्यवस्थापक प्रियांका दळवी, तसेच Quest संस्थेचे मॅनेजर नितीन मराडे उपस्थित होते.

कार्यक्रमात मॉडेल अंगणवाडी मदतनीस यांचा सत्कार आणि प्रमाणपत्र वितरण करण्यात आले. अंगणवाड्यांचे बालशिक्षण केंद्रात रूपांतर घडवून आणण्यासाठी मदतनीसांनी निभावलेली भूमिका विशेषत्वाने अधोरेखित करण्यात आली.पालवी प्रकल्पाच्या प्रवासात आलेले अनुभव, स्वतःमध्ये झालेला आत्मविश्वासाचा विकास आणि मुलांमधील सकारात्मक बदल याबाबत मदतनीस, सेविका व पर्यवेक्षिका यांनी मनोगत व्यक्त केली. उपस्थित मान्यवरांनी अंगणवाड्यातील सुधारलेल्या बालशिक्षणासाठी तसेच सेविकांच्या आत्मविश्वासासाठी सर्वांचे कौतुक केले.

बालविकास प्रकल्प अधिकाऱ्यांनी या कामाची सातत्याने अंमलबजावणी व्हावी यासाठी निर्णयात्मक पावले जाहीर केली.

### २४० अंगणवाड्या पर्यंत बाल शिक्षणाचे कार्य

त्यामध्ये प्रत्येक महिन्यात ‘एक दिवस पूर्वप्राथमिक बालशिक्षणासाठी’ राखून बीटस्तरीय उजळणी प्रशिक्षणे पर्यवेक्षिकांकडून आठवड्यात दोन दिवस प्रत्यक्ष अंगणवाड्यांना भेट रिसोर्स गटाची पूर्वतयारी बैठक बीटनिहाय WhatsApp गटांद्वारे नियमित आढावा

या कार्यक्रमात पालवी प्रकल्पाच्या संपूर्ण टीमला अभिनंदन पत्र देऊन कौतुक व आभार व्यक्त करण्यात आले. प्रकल्पाच्या तीन वर्षांच्या कार्यकाळात अंगणवाड्यांमध्ये झालेला शैक्षणिक बदल आणि सेविकांचा आत्मविश्वास हा या उपक्रमाचा महत्त्वाचा ठेवा ठरल्याचे उपस्थितांनी सांगितले.

**ठाणे महानगरपालिका, ठाणे**

जाहीर सूचना
ठाणे महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक २०२५
प्रसिध्द करण्यात आलेल्या प्रभाग निहाय प्रारुप मतदार याद्यांवर
हरकती व सूचना दाखल करण्याचा सुधारित कार्यक्रम

मा.राज्य निवडणूक आयोगाने पत्र क्र.रानिआ/मनपा-२०२५/प्र.क्र.४१/का-५, दिनांक १४.१०.२०२५, दि.०४.११.२०२५ व दिनांक १३.११.२०२५ अन्वये जाहीर केलेल्या कार्यक्रमानुसार ठाणे महानगरपालिकेच्या सार्वत्रिक निवडणुकीसाठी प्रारुप प्रभाग मतदार याद्या दि.२०.११.२०२५ रोजी प्रसिध्द करण्यात आलेल्या होत्या. त्यावर दिनांक २०.११.२०२५ ते दिनांक २७.११.२०२५ या कालावधीत नागरिकांकडून प्रारुप प्रभाग मतदार यादीवर हरकती व सूचना मागविण्यात आलेल्या होत्या.

तथापि, मा. राज्य निवडणूक आयोगाचे पत्र क्र.रानिआ/मनपा-२०२५/प्र.क्र.४१/का-५, दिनांक २६.११.२०२५ अन्वये मतदार यादीशी संबंधित सुधारीत कार्यक्रम दिलेला आहे. त्या अनुषंगाने दिनांक २८.११.२०२५ ते दिनांक ०३.१२.२०२५ या कालावधीत खालील मुद्दयांवर नागरिकांकडून प्रारुप मतदार यादीवर हरकती व सूचना मागविण्यात येत आहेत.

१) लेखनिकांच्या काही चुका .
२) दुसऱ्या प्रभागातील मतदार चुकून अंतर्भूत झालेले.
३) संबंधित प्रभागातील विधानसभा मतदार यादीत मतदारांची नावे असूनही, महानगरपालिकेच्या संबंधित प्रभागाच्या मतदार यादीमध्ये नावे वगळण्यात आली असल्यास, अशा मतदारांची नावे मतदार यादीत समाविष्ट करणे.
४) मृत व्यक्तींची नावे आढळल्यास किंवा त्याबाबत हरकती व सूचना प्राप्त झाल्यास त्याची नोंद मार्क कॉपी मध्ये घेणे.

उपरोक्त नमूद मुद्दयांवरील लेखी हरकती व सूचना महापालिकेच्या खालील पत्त्यावर विहित मुदतीत कार्यालयीन वेळेत स्विकारण्यात येतील. वरील नमुद मुद्दयांव्यतिरिक्त अन्य मुद्दयांवरील हरकती व सूचना स्विकारल्या जाणार नाहीत. तसेच उपरोक्त मुद्दया व्यतिरिक्त आणि मुदतीनंतर दाखल झालेल्या हरकती व सूचना विचारात घेतल्या जाणार नाहीत. याकरीता मुदतीत हरकती दाखल कराव्यात.

| अ. क्र. | प्रभाग क्र. | संबंधित प्रभागांबाबतच्या मतदार यादीतील हरकती दाखल करण्याचे कार्यालय |
|---|---|---|
| १ | १, २, ३, ८ | सहाय्यक प्राधिकृत अधिकारी तथा सहाय्यक आयुक्त माजिवडा मानपाडा प्रभाग समिती |
| २ | १०, ११, १२ | सहाय्यक प्राधिकृत अधिकारी तथा सहाय्यक आयुक्त उथळसर प्रभाग समिती |
| ३ | ४, ५, ७ | सहाय्यक प्राधिकृत अधिकारी तथा सहाय्यक आयुक्त वर्तकनगर प्रभाग समिती |
| ४ | ६, १३, १४, १५ | सहाय्यक प्राधिकृत अधिकारी तथा सहाय्यक आयुक्त लोकमान्यनगर-सावरकरनगर प्रभाग समिती |
| ५ | १६, १७, १८, | सहाय्यक प्राधिकृत अधिकारी तथा सहाय्यक आयुक्त वागळे प्रभाग समिती |
| ६ | १९, २०, २१, २२ | सहाय्यक प्राधिकृत अधिकारी तथा सहाय्यक आयुक्त नौपाडा-कोपरी प्रभाग समिती |
| ७ | ९, २३, २४, २५ | सहाय्यक प्राधिकृत अधिकारी तथा सहाय्यक आयुक्त कळवा प्रभाग समिती |
| ८ | २६, ३०, ३१, ३२ | सहाय्यक प्राधिकृत अधिकारी तथा सहाय्यक आयुक्त मुंब्रा प्रभाग समिती |
| ९ | २७, २८,२९, ३३ | सहाय्यक प्राधिकृत अधिकारी तथा सहाय्यक आयुक्त दिवा प्रभाग समिती |

मा. राज्य निवडणूक आयोगाकडून हरकत/सूचना नोंदविणेकरीता मतदारांसाठी नमुना-अ व तक्रारदारांसाठी नमुना-ब छापिल विहित नमुन्यातील अर्ज सादर करण्याबाबत सूचना दिलेल्या आहेत. त्यानुसार सदरचे नमुना-अ व नमुना-ब छापील अर्ज सर्व प्रभाग समितीमध्ये उपलब्ध आहेत.

उपरोक्त नमूद तक्त्याप्रमाणे संबंधित प्रभागांच्या मतदार यादीवरील हरकती या फक्त वरील तक्त्यात नमूद सहाय्यक प्राधिकृत अधिकारी तथा सहाय्यक आयुक्त (संबंधित प्रभाग) यांचे कार्यालयात (नमुना-अ व नमुना-ब) लेखी (हार्ड कॉपी) स्वरुपात दाखल कराव्यात. त्या व्यतिरिक्त अन्य ठिकाणी, अन्य कार्यालयात दाखल केलेल्या हरकती व सूचना विचारात घेतल्या जाणार नाहीत. तसेच ऑनलाईन स्वरुपात व ठाणे महानगरपालिकेच्या ई-मेलवर दाखल केलेल्या हरकती व सूचना स्विकारल्या जाणार नाहीत.

प्रस्तूत प्रभागांच्या प्रारुप प्रभाग मतदार याद्या www.thanecity.gov.in या वेबसाईटवर, महानगरपालिका मुख्यालय (निवडणूक विभाग) आणि सर्व प्रभाग समिती कार्यालय येथे पाहण्यासाठी प्रसिध्द करण्यात येत आहेत. निवडणूक विभाग, मुख्यालय येथे सदर मतदार याद्याची आगाऊ मागणी नोंदविल्यास, नागरी सुविधा केंद्र, महापालिका मुख्यालय येथे शुल्क भरुन विक्रीसाठी उपलब्ध केल्या जातील.

ठामपा/पिआरओ/निवडणूक/९३५/२०२५-२६
दि:२७.११.२०२५


सही/-
सौरभ राव, भाप्रसे
प्रशासक तथा आयुक्त
ठाणे महानगरपालिका, ठाणे.

**Pls visit our official web-site www.thanecity.gov.in**

**अनधिकृत बांधकामाला आळा घाला..**
**अनधिकृत बांधकाम दिसल्यास प्रभाग समितीत तक्रार करा !**

# पिण्याचे पाणी नसतांना देखील नागरिकांच्या माथी पाण्याचे बिल

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**



### पाण्याचे बिल रद्द करण्याची संघर्ष रहिवासी संघटनेची मागणी

**कल्याण** : टिटवाळा इंदिरा नगर, स्मशानभूमी रस्ता परिसरातील नागरिकांना पिण्याचे पाणी येत नसतांना देखील कल्याण डोंबिवली महानगरपालिका नियमित पाण्याचे बिल पाठवत असून हे पाण्याचे बिल रद्द करण्याची मागणी संघर्ष रहिवासी संघटनेचे अध्यक्ष गणेश भाटे यांनी अ प्रभागाचे सहाय्यक आयुक्त आणि पाणीपुरवठा विभागाच्या उपअभियंता यांच्याकडे पत्राद्वारे केली आहे.

इंदिरा नगर परिसरात मोठी लोकवस्ती असून गेली अनेक वर्षे येथे नागरिक राहत आहेत. येथील नागरिकांना अनेक समस्या भेडसावत असून यापैकी मुख्य समस्या म्हणजे पिण्याच्या पाण्याची समस्या ज्वलंत आहे. कित्येक वर्षे पाण्याची लाईन नसतांना देखील केडीएमसीच्या वतीने पाण्याचे बिल पाठवले जात आहे. आता महापालिकेने याठिकाणी पाण्याची लाईन टाकली आहे, मात्र नळ कनेक्शनच दिले नाही. असे असतांना देखील पाणी बिल मात्र नियमित येत आहे. याबाबत पालिकेला वारंवार सुचित करून देखील पालिका पाणी बिल पाठवत आहे. येथील नागरिकांना टिटवाळा स्टेशन येथून पिण्याचे पाणी आणावे लागत आहे.

याबाबत संघर्ष रहिवासी संघटना इंदिरानगरचे अध्यक्ष गणेश भाटे यांचा पाठपुरावा सुरू असून सर्व पाणी बिल रद्द करण्याची मागणी त्यांनी केली आहे. यांवर संबंधित सहाय्यक आयुक्तांनी लवकरच सर्वे करु असे सांगितले आहे.

# सामाजिक कार्यकर्ते राहुल करनाडे यांच्या वतीने भव्य संविधान दिन साजरा



**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**जालना** : भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी देशाला दिलेल्या भारतीय राज्यघटनेच्या ७६ व्या वर्धापन दिनानिमित्त मंगळवारी मस्तगड (ता. जालना) येथे सामाजिक कार्यकर्ते राहुल सत्यनारायणजी करनाडे यांच्या वतीने भव्य संविधान दिन साजरा करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी राहुल करनाडे होते. सुरुवातीला मान्यवरांच्या हस्ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. त्यानंतर उपस्थित सर्व बहुजन बांधवांनी भारतीय राज्यघटनेच्या प्रस्तावनेचे (Preamble) सामूहिक वाचन केले. अध्यक्षीय भाषणात राहुल करनाडे म्हणाले, “डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी दिलेली ही राज्यघटना ही शोषित, वंचित, दलित, आदिवासी व बहुजन समाजाला समता, स्वातंत्र्य, बंधुता व न्याय देणारा पवित्र दस्तऐवज आहे. आज संविधानावर सतत होणारे हल्ले पाहता ‘संविधान वाचवा, देश वाचवा’ ही मोहीम आपण घराघरात पोहोचवली पाहिजे. बहुजन समाज एकजूट झाला तरच बाबासाहेबांचे स्वप्न पूर्ण होईल.” कार्यक्रमास विजय ओमप्रकाश भगत, अमोल भक्कड, शेख सिद्दीक, भरतनंद भक्त (पहलवान), उमेशसिंह राजपूत तसेच परिसरातील बहुजन बांधव व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी राहुल सत्यनारायणजी करनाडे मित्रपरिवार यांनी विशेष परिश्रम घेतले.

Printed by SIDDHAKALA PRINT SOLUTION LLP Published by GHODVINDE RAVINDRA NARAYAN on behalf of GHODVINDE RAVINDRA NARAYAN,
Printed at Thane and published at Building No-B-24, Room no-9, Gholap Nagar, Murbad Road, Near Anupam Nagar, Kalyan (West). Editor GHODVINDE RAVINDRA NARAYAN.
Contact No. - 908266 4781 / 9619188558 E Mail - jeevandeepvartanews2020@gmail.com / news.thanejeevandeep@gmail.com
RNI NO : MAHMAR/2016/72091 ■ Postal Reg. No. THC/256/2022-2024